CNR NO. MHPU1300-1906-2016 **रे.दि.मु.नं. ३९२/२०१६**

## निशाणी ५३, ५५ आणि ५७ खालील एकत्रित आदेश

(श्री. सोनबा अर्जुन यादव वि. श्रीमती इंदुबाई विठ्ठल यादव वगैरे)

प्रस्तुतचे अर्ज वादीतर्फे वादी क्र. ८ पुष्पा सुरेश सोनवणे यांचेविरुध्दचा 'दावा रद्द करण्याचा' हुकूम रद्द होऊन मिळणेसाठी, वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी व वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केलेले आहेत. वादींच्या कथनानुसार, वादी क्र. ८ हे दि. ०६.०७.२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक असल्याबाबत वादीस अज्ञान असल्यामुळे त्यांनी वादी क. ८ च्या मृत्यू बाबत विधिज्ञांना माहिती दिली नाही. त्यामुळे वादी क्र. ८ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास ३ महिने २ दिवसांचा उशिर झाला आहे. त्यामुळे वादी क्र. ८ चे विरुध्द अबेटमेंट आदेश रद्य होवून वारस रेकॉर्डवर घेण्याकामी झालेला विलंब माफ होवून वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळाली अशी विनंती केली.

२. सदरच्या अर्जावर प्रतिवादीविरुध्द विना म्हणणे आदेश झालेला आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व स्वतंत्र कब्जासाठी दाखल केलेला आहे. वादी क्र. १ च्या मृत्युबाबत वाद नाही. वादीने अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच कै. पुष्पा सुरेश सोनवणे यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. अर्ज दाखल करण्यास वादींनी विलंब केला आहे हे दिसून येते. तसेच दाव्यातील मागणी पाहता, वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्ही पक्षकारांना योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, दावा गुणदोषांवर निर्गत होणेस मदतच होईल. परंतु, अर्ज नामंजुर केल्यास प्रक्रियात्मक विलंब वाढून दोन्ही पक्षकारांचे नुकसान होणार आहे, दाव्यास विलंब होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. वादींनी केलेल्या विलंबाचे

कारण विचारात घेता विलंबाचा खर्च त्यांच्यावर ठेवणे योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज (नि. ५३, ५५ व ५७) हे वादींनी प्रतिवादींना विलंबाचा खर्च रक्कम रुपये २००/– एवढया देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतात.

**२.** वादी क्र. ८ चे विरुद्ध दावा रद्दचा आदेश रद्द करण्यात येतो, वादी क्र. ८ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करण्यात येतो, वादी क्र. ८ चे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

**३.** वादींनी प्रस्तावित दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यत अभिलेखावर दाखल करावी.

*सही/–*

**( सौ. एस. के. देशमुख )**

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सासवड.

सासवड.

दिनांक २६/११/२०२५.